# समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका
## जाहीर प्रकटन सन २०२१–२०२२

**महिला व बाल कल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, दिव्यांग कल्याणकारी योजना या योजनांअंतर्गत महिला/पुरूषांकडून खालील योजनांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविणेत येत आहे.**

| अ.क्र. | योजनेचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १. | **व्यसन मुक्तिसाठी अर्थसहाय्य** | पुणे मनपा हद्दीतील १८ ते ४५ वयोगटातील व्यक्ती अंमली पदार्थांच्या आहारी गेल्यास त्यांना त्या पासून मुक्त करणेसाठी शासनमान्य अथवा मान्यता प्राप्त व्यसनमुक्ति केंद्रात उपचारासाठी रू. ७०००/– पर्यंत अनुदान देण्यात येते (फक्त मागासवर्गीयांसाठी) |
| २. | **झोपडी दुरूस्ती** | पुणे मनपा हद्दीतील नागरिकांना झोपडी दुरूस्तीसाठी रू.१०,०००/– पर्यंत अनुदान दिले जाते. (फक्त मागासवर्गीयांसाठी) |
| ३. | **वैयक्तिक नळ कनेक्शन** | पुणे मनपा हद्दीतील नागरिकांना नळ कनेक्शनसाठी रू.५०००/– पर्यंत अनुदान दिले जाते. (फक्त मागासवर्गीयांसाठी) |
| ४. | **वैयक्तिक वीज कनेक्शन** | पुणे मनपा हद्दीतील नागरिकांना विज कनेक्शनसाठी रू.५०००/– अनुदान दिले जाते. (फक्त मागासवर्गीयांसाठी) |
| ५. | **वैयक्तिक शौचालय बांधणे** | पुणे मनपा हद्दीतील नागरीकांना वैयक्तिक शौचालय बांधणेकरीता रू.१५,०००/– पर्यंत अनुदान दिले जाते. (फक्त मागासवर्गीयांसाठी) |
| | **वरील अ.क्र. २ ते ५ या योजनांची अंमलबजावणी क्षेत्रिय कार्यालयामार्फत केली जाईल.** | |
| ६. | **लाडकी लेक (मुलगी दत्तक) योजना** | मुलगी जन्मास आल्यानंतर १ वर्षाचे आत लाभ देणेत येतो. या योजना अंतर्गत पालकाने लोकसहभागातून जमा केलेली अथवा स्वतःची रक्कम रू. १० हजार व पुणे महानगरपालिकेची रक्कम रू. २० हजार असे एकूण रक्कम रू. ३० हजार राष्ट्रीयकृत बँक/डाक विभागाकडील किसान विकास पत्र/दिर्घ मुदतीची गुंतवणूक योजना मध्ये मुलीच्या नावे दामदुप्पट योजनेत गुंतविणेत येईल. तसेच या योजना अंतर्गत फक्त एका मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली असल्यास पालकाने लोकसहभागातून अथवा स्वतःची जमा केलेली रक्कम रू. १० हजार व पुणे महानगरपालिकेचा हिस्सा रक्कम रू. २० हजाराच्या दुप्पट (र. रु. ४० हजार) असे एकूण रक्कम रू. ५० हजार राष्ट्रीयकृत बँक/डाक विभागाकडील किसान विकास पत्र/दिर्घ मुदतीची गुंतवणूक योजना मध्ये मुलीच्या नावे दामदुप्पट योजनेत गुंतविणेत येईल. |
| ७. | **कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या कुटुंबांना प्रोत्साहनपर योजना** | मुलगा नसताना एक वा दोन मुलींवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेली असल्यास एकच मुलगी असेल तर तिच्या नावे रक्कम रू.१०,०००/– व दोन मुली असतील तर प्रत्येकी रक्कम रू.५०००/– युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया मध्ये गुंतविण्यात येतील. कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यानंतर १ वर्षाचे आत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. |
| ८. | **विधवा महिलांना अर्थसहाय्य** | घरातील कर्त्या पुरूषाचे निधन झाल्यास त्याचे विधवा पत्नीस रू.१५,०००/– अनुदान (एकदाच) देणेची योजना आहे. मृत व्यक्तिचे वय १८ ते ६५ वर्षाच्या दरम्यान असावे. मृत्यू झाल्यानंतर २ वर्षाच्या आत अनुदानाचा अर्ज सादर करणे बंधनकारक राहिल. |
| ९. | **अपंग (दिव्यांग) व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य** | पुणे मनपा हद्दीतील अपंगांना (दिव्यांग) स्वयंरोजगार करणेसाठी रू.१५०००/– अर्थसहाय्य दिले जाईल. |
| १०. | **अपंग (दिव्यांग) व्यक्तींना अल्पकालिन व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी अर्थसहाय्य** | ज्या अपंग (दिव्यांग) व्यक्तिंना समाज विकास विभागामार्फत सुरू असलेल्या व्यवसाय प्रशिक्षण संस्थेतून प्रशिक्षण घेणे अडचणीचे असल्यास शासनमान्य अधिकृत संस्थेत प्रवेश घेतला असेल अशा संस्थेस जास्तीत जास्त रक्कम रू. १०,०००/– किंवा संस्थेची प्रशिक्षणासाठी असणारी फी या पैकी जी रक्कम कमी असेल ती प्रशिक्षण खर्चापोटी देणेत येईल. |
| ११. | **अपंग (दिव्यांग) विद्यार्थ्यांना दीर्घ मुदतीचे शैक्षणिक वा तांत्रिक अभ्यासक्रमासाठी अर्थसहाय्य** | जे अपंग (दिव्यांग) विद्यार्थी इ. १० व इ. १२ वी नंतर तांत्रिक, वैद्यकिय, इंजिनिअरींग, व्यवस्थापकीय, संगणकीय किंवा इतर उच्च शिक्षणासाठी किंवा विद्यापीठ मान्यता प्राप्त तांत्रिक कोर्सला प्रवेश घेतील अशा अपंग (निःसमर्थ) विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कालावधीत रू.१०,०००/– अर्थसहाय्य दिले जाईल.तसेच ज्या संस्थेत प्रवेश घेतला असेल ती संस्था शासनमान्य असणे बंधनकारक राहिल. |

| अ.क्र. | योजनेचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १२. | **अंध, अपंग (निःसमर्थ), विकलांग, मुकबधिर व्यक्तिंना कृत्रिम अवयव घेणेसाठी योजना.** | अंध, अपंग (दिव्यांग), विकलांग, मुकबधिर व तत्सम अपंग (दिव्यांग) व्यक्तिंना आपले दैनंदिन काम करताना उपयोगी पडणारे कृत्रिम साधनांसाठी रू.२०,०००/– अर्थसहाय्य देणेत येईल. |
| १३. | **महापालिका क्षेत्रातील १८ वर्षापुढील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करणाऱ्या महापालिका हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तीच्या पालकांस अर्थसहाय्य.** | पुणे महानगरपालिका परिसरात वास्तव्य असलेल्या किमान १५ मतिमंद व्यक्ती ज्यांचे वय १८ पेक्षा अधिक आहे त्यांचा सांभाळ करण्याकरिता नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस प्रति मतिमंद व्यक्तीकरिता र. रू. १२,०००/– वार्षिक अर्थसहाय्य अदा करण्यात येईल अथवा महापालिका हद्दीतील वास्तव्य आणि वय १८ वर्षपेक्षा अधिक असलेल्या मतिमंद व्यक्तीच्या पालकास आपल्या पाल्याच्या पालन–पोषण करण्याकरिता एकूण र. रू. १२,०००/– वार्षिक अर्थसहाय्य अदा करणेत येईल. |
| १४. | **कुष्ठ पिडीत व १००% अतितीव्र अपंग (निःसमर्थ) व्यक्तीकरिता वार्षिक अर्थसहाय्य योजना** | महापालिका हद्दीतील १८ वर्षे पूर्ण व त्या पुढील वयाच्या कार्यात्मक/क्रियात्मक अपंगत्व (निःसमर्थ) असलेल्या कुष्ठ पिडीत व १००% अतितीव्र अपंग (निःसमर्थ) व्यक्तीस वार्षिक रक्कम रू. १२,०००/– अर्थसहाय्य देणेत येईल. |
| १५. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त माता रमाई भिमराव आंबेडकर योजनेअंतर्गत गवनि घोषीत व शहरी गरीब योजनेतील पात्र ठरणाऱ्या विधवा, निराधार महिलांसाठी प्राथमिक आरोग्य संगोपन करीता अर्थसहाय्य** | केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व संजय गांधी निराधार अनुदान योजना अंतर्गत लाभ घेत नसलेल्या लाभार्थ्यांना दरमहा रक्कम रू.१०००/– प्रमाणे वार्षिक रक्कम रू.१२०००/– देण्यात येईल. |
| १६. | **माता रमाई स्वावलंबन योजने अंतर्गत सर्व स्तरातील विधवा, परितकत्या, निराधार महिलांना प्राथमिक आरोग्य संगोपन करीता अर्थसहाय्य** | केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व संजय गांधी निराधार अनुदान योजना अंतर्गत लाभ घेत नसलेल्या लाभार्थ्यांना दरमहा रक्कम रू.१०००/– प्रमाणे वार्षिक रक्कम रू.१२०००/– देण्यात येईल.. |

ऑनलाईन अर्ज भरणे करिता विनामुल्य सुविधा दि.१३ ऑक्टोबर २०२१ ते दि.२८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत सकाळी ११.०० ते सायं. ०५.३० पर्यत त्या त्या कार्यक्षेत्रातील क्षेत्रिय कार्यालयामध्ये करणेत आली आहे.

या बाबतचा तपशील व अटी व शर्ती या पुणे महानगरपालिकेच्या **dbt.punecorporation.org** या संकेतस्थळावरती बघण्यात यावे. अधिक माहितीसाठी संपर्क क्र. १८००१०३०२२२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

**(रंजना गगे)**
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका